# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 365/2022 दिनांक : 21.09.2022**

## बॉम्ब शोधक व नाशक पथकाचे किडस् किंगडम शाळेत प्रात्यक्षीक...

दिनांक 20.09.2022 रोजी किडस् किंगडम हायस्कुल, पासदगाव येथे नांदेड पोलीस दलातील बॉम्ब शोधक व नाशक पथका तर्फे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. बॉम्ब शोधक व नाशक पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार उपकरण कसे हाताळतात या बाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

एखादी घटना घडली, बेवारस बॅग वस्तु आढळुन आल्यास बॉम्ब शोधक व नाशक पथकाला घटनास्थळावर बोलविण्यात येते. सदर पथक घटनास्थळावर जाऊन कशा प्रकारे कार्यवाही करते या बाबत विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिक दाखविण्यात आले. नांदेड पोलीस दलातील बॉम्ब शोधक व नाशक पथकात काम करणारे श्वॉन सिबा यांचेकडुन प्रात्याक्षिक करून दाखण्यात आले. बेवारस वस्तु कशा पध्दतीने हातळली जाते या बाबत माहिती देण्यात आली. समाजामध्ये वावरतांना विद्यार्थ्यी व नागरीकांनी कोणती दक्षता घ्यावी. बेवारस व संशायस्पध वस्तु आढळयास कोणती काळजी घ्यावी. बीडीडीएसचे **पोनि जयप्रकाश गुट्टे** यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी किडस् किंगडम हायस्कुलचे प्राचार्य श्रीमती माहेश्वरी व स्टाफ हजर होते. बी.डी.डी.एस. पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे शाळेतर्फे झाडाचे रोप देवून स्वागत करण्यात आले.

सदर प्रात्यक्षिक **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री निलेश मोरे,** अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री विजय कबाडे**, अपर पोलीस अधिक्षक भोकर, **मा. श्रीमती अश्विनी जगताप,** पोलीस उप अधिक्षक (मु.) नांदेड यांचे मार्गदर्शानाखाली बीडीडीएसचे पोलीस अधिकारी **जयप्रकाश गुट्टे,** पोनि व पोलीस अंमलदार पोकॉ/माधव पांचाळ, रमेश पावडे, राम कोल्हे, शंकर जाधव, चालक पोना /शैलेश शिरसे यांनी सहभाग घेतला आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


SCHOOL BUS
HULCHUL


2022/09/20 12:34

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 366/2022 दिनांक : 21.09.2022**

## 1)खुनाचा प्रयत्न :—

**रामतिर्थ :—**दिनांक 18.09.2022 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे घराचे स्लॅपवरून नरसी ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून जुन्या भांडणाचा राग मनात धरून आरोपीतांनी फिर्यादीस आरोपीचे घराचे दुसऱ्या मजल्याचे वर बोलावुन तुझ्या जागेत कंपाऊंड वॉलचे कुठे बांधकाम आहे असे म्हणुन शिवीगाळ करून थापड बुक्यांनी मारहाण केली तसेच चेतावणी देवून आरोपीतांनी फिर्यादीस दुसऱ्या मजल्यावरुन ढकलून देवून गंभीर दुखातप करुन खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी शंकरराव रेवणआप्पा कस्तुरे वय 55 वर्षे व्यवसाय नौकरी रा. नरसी ता. नायगाव ति. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरन 151/2022 कलम 307,323,504,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री दिघे, मो. नं. 9834255985** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :—

**नांदेड ग्रामीण :—** दिनांक 19.09.2022 रोजी 05.00 वा. ते दिनांक 20.09.2022 रोजी 03.45 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी पोलीस वसाहत राठोड कार्नर धनेगाव ता.जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे मुख्य दरवाज्याचे लॉक तोडुन आत प्रवेश करुन कपाटाचे लॉक तोडून लॉकर मध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने व नगदी असा एकुण 13,90,000/—रूपायाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी ज्ञानोबा कोंडीबा नायकवाडे वय 57 वर्षे, व्यवसाय नौकरी बिनतारी संदेश विभाग,नांदेड रा. पोलीस वसाहत राठोड कॉर्नर, धनेगाव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 568/2022 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री नरवटे, मो.क्रं. 8149863325** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :—

**1)विमातनळ :—** दिनांक 20.09.2022 रोजी 00.30 ते 07.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे रुमच्या बिल्डींग समोर नाईकनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे मावस भावाचे नावे असलेली बजाज पल्सर कंपणीची मो सा क्रं एमएच—26/सीए—3880 काळया रंगाची किंमती 70,000/—रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी नागेश बालाजी वानखेडे, वय 21 वर्षे व्यवसाय खाजगी नौकरी रा. पळसपुर ता. हिमायतनगर जि. नांदेड ह.मु. नाईकनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 319/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/967 गायकवाड, मो.क्रं. 9529796606** हे करीत आहेत.

**2)उस्माननगर :—** दिनांक 19.09.2022 रोजी 06.00 वा. ते दिनांक 20.09.2022 रोजी 06.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घराचे बाजुला काटकळंबा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा शाईन कंपणीची मो सा क्रं एमएच—26/एएच—2746 किंमती 30,000/—रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी पांडुरंग जयराम आघाव, वय 52 वर्षे व्यवसाय नौकरी रा. काटकळंबा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरन 161/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/706 पवार, मो.क्रं. 9373545955** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :—

**1)भाग्यनगर :—** दिनांक 05.05.2021 चे 19.00 वा. ते दिनांक 15.09.2022 रोजी 14.00 वा. चे दरम्यान, **दत्त मंदीर रोड वाकड पुणे, ह.मु. पालीनगर तरोडा खु., नांदेड येथे,** यातील नमुद दहा आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस तु आमच्या घरात शोभत नाहीस तुझ्या सोबत आमच्या मुलाच लग्न करुन फसलो आहोत, माहेरहुन पंचविश लाख रूपये पुणे येथे प्लॉट घेण्यासाठी घेवुन ये म्हणुन शिवीगाळ करुन मारहाण केली व तिचा शारिरीक व माणसीक छळ केला तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 28 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 328/2022 कलम 498(अ),313,323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कांबळे, मो.क्रं. 9823031227** हे करीत आहेत.

**2)माळाकोळी :–**लग्नानंतर एक वर्ष ते दिनांक 10.10.2021 पर्यंत, **मौजे बेटमोगरा ता. मुखेड जि. नांदेड ह.मु. देऊळगाव ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस तिचे चारित्र्यावर संशय घेवून चोरीचा आळ घालून माहेरहुन घर बांधण्यासाठी दोन लाख रुपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ करुन मारहाण केली व तिचा शारिरीक व माणसीक छळ केला तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 21 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 101/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1888 क्षीरसागर, मो.क्रं. 8652147575** हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**लिंबगाव :–** दिनांक 15.09.2022 रोजी 19.28 वा. चे सुमारास, **मौजे सायाळ फाटयाजवळ ता. जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत यास जोराची धडक देवून गंभीर दुखापत करुन यातील **मयत चंद्रकांत शंकरराव धुमाळ वय 25 वर्षे व्यवसाय मजुरी रा. सायाळ ता.जि.नांदेड** यांचे मरणास कारणीभुत झाला वगैरे **फिर्यादी राणोजी विठ्ठलराव धुमाळ वय 45 वर्षे व्यवसाय शेती रा. सायाळ ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं. 143/2022 कलम 279,304(अ) भादवी सह कलम 134 मोटार वाहन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री दामोदर, मो.क्र. 9823971641** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 19.09.2022 रोजी 23.40 वा. चे सुमारास, **मोहन रापोळे यांचे घराजवळ मोकळे मैदान गणेशनगर, नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 2130/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री मिलींद मधुकर सोनकांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 349/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/835 बामने, मो.क्र. 8308878094** हे करीत आहेत.

## 7)विषबाधा :–

**भोकर :–** दिनांक 16.09.2022 रोजी 10.00 वा. सुमारास, **सरकारी दवाखाना विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील **मयत नामे परमेश्वर मलकन्ना बालवाड वय 45 वर्षे, रा. किनी ता. भोकर जि. नांदेड,** हे शेतात कापूस पिकावर फवारणी करते वेळी त्यांचे तोंडात औषध गेल्याने तो जमिनीवर चक्कर येवून पडल्याने त्यास उपचार कामी सरकारी दवाखाना किनी येथे नेले तेथुन सरकारी दवाखाना भोकर येथे नेले व तेथुन पुढील उपचारासाठी सरकारी दवाखाना विष्णुपुरी नांदेड येथे दाखल केले असता उपचार चालु असताना मरणा पावला. वगैरे **खबर देणार पोह/2093 एस.के.बयास, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे भोकर** आ. मृ. **56**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2820 जाधव, मो.नं. 9823227195** हे करीत आहेत.

## 8)पळवुन नेले :–

**कंधार :–** दिनांक 20.09.2022 रोजी चे 10.30 वा. चे सुमारास, **मौ. सावरगाव फाटा चोळी तांडा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे काका हे सोबत गावाकडे जात असतांना त्यांचे रस्त्यावर मो सा समोर येऊन **सुधाकर जाधव** यास मो सा वरून खाली उतरून उसाचे पैसे अजुन दिले नाही असे म्हणुन थापडा बुक्कयाने मारहाण करून पळवुन नेले. वगैरे, **फिर्यादी बालाजी मिठु चव्हाण, वय 38 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. चोळी तांडा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 296/2022 कलम 363, 365, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री अदित्य लोणीकर, मो.क्र. 9422336474** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड